गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ६७ वा ● बुधवार २४ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 67 | Date : 24/07/2024 | blow Wednesday | Page 4Price 4


# केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर; सर्वसामान्यांना दिलासा

## * गरीब, महिला, तरुण आणि शेतकऱ्यांसाठी भरीव तरतुदी
## * कर प्रणालीमध्ये बदल; ३ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त
## * केंद्र सरकारचे नऊ प्राधान्यक्रम जाहीर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : केंद्र सरकारने संसदेच्या अधिवेशनात मंगळवारी लोकसभेत अर्थसंकल्प सादर केला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग सातव्यांदा अर्थसंकल्प सादर करून नवा विक्रम केला आहे. या अर्थसंकल्पात सर्वसामान्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. सरकारने बिहार आणि आंध्र प्रदेशवर घोषणांचा वर्षाव केला. यासोबतच पुढील पाच वर्षांचे उद्दिष्ट सांगताना अर्थमंत्र्यांनी केंद्र सरकारचे नऊ प्राधान्यक्रम जाहीर केले. कृषी, रोजगार, सामाजिक न्याय, शहरी विकास, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, नवकल्पना आणि सुधारणांमधील उत्पादकता आणि लवचिकता यांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे अर्थसंकल्पात सांगण्यात आले. कर प्रणालीमध्ये बदल करण्यात आले असून, त्याअंतर्गत तीन लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न आता करमुक्त असेल. अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पाचे वर्णन गरीब, महिला, तरुण आणिशेतकरी यांचे बजेट असे केले.



### अर्थमंत्र्यांनी उघडली सामान्यांसाठी तिजोरी, १० मोठ्या घोषणा

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ लोकसभेत सादर करताना सामान्य लोकांसाठी मोठ्या घोषणा केल्या आहेत. या अर्थसंकल्पात नऊ प्राधान्यक्रम निश्रि्चत करण्यात आले आहेत. रोजगार, कृषी, या क्षेत्राबरोबरच अनेक गोष्टी स्वस्त करण्यात आल्या आहेत. पाहूयात सामान्यांसाठी कोणत्या मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत.

नव्या कररचनेमध्ये मोठा बदल : अर्थसंकल्पात निर्मला सीतारमण यांनी देशातील गरीब करदात्यांना मोठा दिलासा दिला आहे. नव्या कररचनेनुसार ० ते ३ लाख रुपये उत्पन्न असणाऱ्यांना कोणताही टॅक्स लागणार नाही. ३ ते ७ लाखापर्यंतच्या उत्पन्नावर ५ %, ७ ते १० लाखांच्या उत्पन्नावर १० %, १० ते १२ लाख उत्पन्नावर १५ %, १२ ते १५ लाखांच्या उत्पन्नावर २० टक्के कर आकारला जाणार आहे.

टीडीएससंदर्भात मोठा दिलासा : विलंबाने टीडीएस भरणे यापुढे गुन्हा नाही. आयकर कायदा १९६१ ची पुढील सहा महिन्यात समीक्षा होणार. आयकर परतावा भरणं अधिक सुलभ होणार, अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी केली

या गोष्टी स्वस्त : अर्थसंकल्प २०२४-२५ मध्ये इंपोर्टेड ज्वेलरी स्वस्त, इलेक्ट्रीक वाहनं, मोबाईल फोन्स आणि चार्जर, एक्स रे मशीन, । पान २ वर

### ‘मध्यमवर्गाचे सशक्तीकरण करणारा अर्थसंकल्प’ : पंतप्रधान नरेंद्र मोदी



अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि त्यांचे सहकारी अभिनंदनास पात्र आहेत. हा अर्थसंकल्प समाजातील प्रत्येक घटकाला शक्ती देणारा आहे. हा देशातील ग्रामीण भागातील गरीबांना समृद्धीच्या वाटेवर नेणारा अर्थसंकल्प आहे. मागच्या दहा वर्षात २५ कोटी लोक गरीबीतून बाहेर निघाले. या माध्यमातून जो नव मध्यम वर्ग तयार झाला. त्यांना या अर्थसंकल्पातून सशक्तीकरण करण्यात आले आहे. युवकांना असंख्य नव्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शिक्षण आणि कौशल्य विकासाला या अर्थसंकल्पातून एक नवी गती मिळेल. मध्यम वर्गाला शक्ती देणारा अर्थसंकल्प आहे. दलित आणि वंचितांना सशक्त करणाऱ्या नव्या योजनांसर हा अर्थसंकल्प समोर आला आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर काढले. या अर्थसंकल्पातून सूक्ष्म, लघू, मध्यम औद्योगिक क्षेत्राला नवी चालना मिळाली आहे. ई-कॉमर्स एक्सपोर्ट हब आणि फूड क्वालिटी टेस्टिंगसाठी १०० युनिट स्थापन करण्यात येणार आहेत. यातून वन प्रॉडक्ट, वन डिस्ट्रिक्ट योजनेला गती मिळेल. आमच्या स्टार्टअप आणि संशोधक वृत्तीच्या लोकांसाठी हा अर्थसंकल्प खूप साऱ्या संधी घेऊन आला आहे. अवकाश तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी एक हजार कोटींचा निधी देणे असो किंवा एंजल कर हटविण्याचा निर्णय असो, असे अनेक महत्त्वाचे निर्णय अर्थसंकल्पातून घेण्यात आल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### राज्याच्या विविध पायाभूत प्रकल्पांसाठी ७५४५ कोटी रूपयांची तरतूद

राज्याच्या १३ पायाभूत प्रकल्पांसाठी आजच्या अर्थसंकल्पात रूपये सात हजार पाचशे पंचेचाळीस कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली असून, राज्याच्या विकासाला गती देणारा हा अर्थसंकल्प ठरेल. यामध्ये विदर्भ-मराठवाडा दुष्काळग्रस्त सिंचन प्रकल्पांसाठी ६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे शेतक-यांना दिलासा मिळेल. यासोबतच, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार प्रकल्पांतर्गत रूपये ४०० कोटी रूपयांची, सर्वसमावेशक विकासकामांसाठी (इकॉनॉमिक कॉरिडॉर) ४६६ कोटी रुपये रुपयांची, पर्यावरणपूरक शाश्र्वत पर्यावरणपूरक कृषि प्रकल्पासाठी रूपये ५९८ कोटी, महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्पासाठी रूपये १५० कोटी (केंद्रशासनाकडून मिळणारा वाटा), मुंबई शहरी परिवहन प्रकल्पासाठी ९०८ कोटी, मुंबई मेट्रोसाठी १०८७ कोटी रूपये, दिल्ली -मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी रूपये ४९९ कोटी, मुंबई महानगर प्रदेश हरित शहरी गतिशीलता प्रकल्पासाठी रूपये १५० कोटी, नागपूर मेट्रोसाठी रूपये ६८३ कोटी तर पुणे मेट्रो प्रकल्पासाठी रूपये ८१४ कोटी, नाग-नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी ५०० कोटी तर मुळा मुठा नदी संवर्धन प्रकल्पासाठी रूपये ६९० कोटी रूपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री वयोश्री योजने’अंतर्गत वृध्दांना मिळणार लाभ
### सामाजिक न्याय विभागाकडे अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणेकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे त्यांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पात्र वृध्दांना लाभ मिळण्यासाठी सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाकडे अर्ज मागविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थतता/ दुर्बलातेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक, व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इ. सहाय्यभूत आवश्यक साधने/ उपकरणे खरेदी करणे तसेच योगोपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र / प्रशिक्षण केंद्र आदीव्दारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजने अंतर्गत निधीचे वितरण ऑनलाईन पध्दतीने (महाडीबीटी) ३ हजार रुपयांच्या मर्यादेत । पान २ वर

## ॲड.प्रकाश आंबेडकर यांचे शरद पवारांना पत्र
### आरक्षण बचाव यात्रेत सहभागी होण्यासाठी निमंत्रण !

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार) प्रमुख शरद पवार यांना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी पत्र लिहून आरक्षण बचाव यात्रेत सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले आहे. त्यांच्या सहभागी होण्याची मी वाट पाहत असल्याचेही आंबेडकर यांनी सांगितले आहे.

ओबीसी आरक्षण बचाव यात्रा २५ जुलैला चैत्यभूमी, मुंबई येथून सुरू होणार असून त्याच दिवशी पुण्यातील महात्मा फुले वाड्यालाही भेट देण्यात येणार आहे. राज्यातील अनेक



जिल्ह्यातून ही यात्रा जाणार आहे. काल मंत्री छगन भुजबळ यांनाही ड. आंबेडकर यांनी निमंत्रित केले होते. ड. आंबेडकर यांचे निमंत्रण स्वीकारून हे नेते आरक्षण बचाव यात्रेत सहभागी होणार का ? । पान २ वर



**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई च्या दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा निघत आहे.या पार्श्र्वभूमीवर संघटनेचे विदर्भ अध्यक्ष निलेश सोमानी यांनी मंगळवारी मुंबई येथे मंत्रालयात कृषी मंत्री माननीय धनंजय मुंडे आणि सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन यात्रे विषयी माहिती दिली आणि यात्रा पोस्टरचे प्रकाशन केले. दोन्ही मंत्र्यांनी संवाद यात्रेला शुभेच्छा दिल्या.आणि सरकार मागण्यांबाबत सकारात्मक विचार करील अशी ग्वाही दिली.**

# राज्यातील पत्रकारांच्या एकीच्या शक्तीचे दर्शन सरकारला घडेल : वसंत मुंडे

## दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेला २८ जुलैपासून प्रारंभ

### मान्यवरांच्या हस्ते पोस्टर प्रकाशन

पत्रकारांच्या विविध न्याय मागण्यांसाठी सर्व पत्रकारांना सोबत घेवून विविध राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील विचारवंत, नामवंत यांचा पाठींबा घेत नागपूर दिक्षाभूमी ते मंत्रालय मुंबई अशी पत्रकार संवाद यात्रा राज्याच्याच नव्हे तर कदाचित देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच निघणार असल्याने इतिहास घडणार आहे. यात्रा पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बीड/प्रतिनिधी : केंद्र आणि राज्य सरकारची एकूण धोरणे लक्षात घेता जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील छोटी वृत्तपत्रे आणि पत्रकार ही व्यवस्था कमजोर करण्याचीच राहिली आहेत. समाजातील विविध व्यावसायीक, नोकरदार, तरूण, महिला या घटकांना न्याय देताना पत्रकारांच्या मागण्यांकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. सरकार मतपेढीचा विचार करून हजारो कोटींच्या घोषणा करते. मात्र सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणार्या पत्रकारांचेच प्रश्न पाठपुरावा करूनही सुटत नाहीत. पत्रकारही समाजातील प्रमुख घटक आहेत. याची आठवण करून देण्यासाठी संवाद यात्रा होणार आहे. संवाद ही नैसर्गिक प्रक्रिया असून ती थेट वैयक्तीक आणि संस्थात्मक परिवर्तन घडवते. यात्रा पत्रकारांचे प्रश्न सरकारला सांगण्यासाठी आणि पत्रकारांना समजुन घेण्यासाठी संधी प्रदान करणार आहे. रविवार दि.२८ जुलै रोजी नागपूरच्या दिक्षाभूमीतून यात्रेचा शुभारंभ होणार असुन यात्रेचा समारोप मुंबई मंत्रालय येथे होणार आहे असे पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

बीड येथील हॉटेल निलकमल येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी, लोकशाहीच्या बळकटीसाटी काढण्यात येणार्या दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा संदर्भात पत्रकार परिषद घेवून सविस्तर माहिती दिली. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ संपादक राजेंद्र



आगवान,ज्येष्ठ संपादक सुनील क्षीरसागर,पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानूरकर, संपादक संघाचे अध्यक्ष नरेंद्र कांकरिया,ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे,ज्येष्ठ फोटोग्राफर विश्र्वनाथ माणूसमारे, लोकपत्रकार भागवत तावरे, संजय मालानी, बालाजी मारगुडे, दिनेश लिंबेकर,शेखर कुमार,वैभव स्वामी यांची प्रमुख उपस्थिती व्यासपीठावर होती. यावेळी पत्रकार संवाद यात्रे संदर्भात अधिक माहिती देताना पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की, भारतीय लोकशाहीत वृत्तपत्र, पत्रकार आणि प्रसारमाध्यमात । पान २ वर

### कै.पत्रकार सुधाकर सोनवणे यांच्या कुटुंबियांना केली आर्थिक मदत

परखड आणि सडेतोड लिखाण करणारे पत्रकार सुधाकर सोनवणे यांचे कर्करोगाने अल्पवयात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर दोन लहान मुले, पत्नी यांच्यापुढे जगावे कसे? असा मोठा प्रश्न्र आर्थिक अडचणीमुळे निर्माण झालेला आहे. या कुटुंबीयांना आधार म्हणून पत्रकार संघाच्या वतीने रोख दहा हजार रुपयाची मदत यावेळी करण्यात आली. त्याचबरोबर सोनवणे यांच्या कुटुंबीयांना दानशूरांनी पुढे येऊन मदत करावी असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. दानशूरांनी सोनवणे कुटुंबीयांना मदत करण्यासाठी मयत सुधाकर सोनवणे यांच्या धर्मपत्नी तत्त्वशीला सुधाकर सोनवणे यांच्या ९५ ६१ २५ ९२ ६७ या नंबरवर संपर्क साधावा.

## संपादकीय

### ऐवढी माफक अपेक्षा..

ऑलिम्पिक म्हणजे खेळांचा महाकुंभ, विश्वातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठित क्रीडास्पर्धा. अवघ्या जगतातून एकापेक्षा एक सरस खेळाडू या स्पर्धेमध्ये कौशल्य दाखवणार आहेत. पॅरिस ऑलिम्पिक सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस उरले असल्याने जगभरातल्या क्रीडा चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. पॅरिसमध्ये तिरंदाजी ही भारताची सलामीची स्पर्धा असेल. २६ जुलै रोजी उद्घाटन समारंभाच्या एक दिवस आधी ती सुरू होईल. तिरंदाजीमध्ये पाच पदके स्पर्धा होणार असून सर्वांमध्ये भारत आपली दावेदारी मांडणार आहे. भारताच्या ऑलिम्पिक कुस्ती दलात पुरुषांपेक्षा महिला कुस्तीपटूंची संख्या अधिक असेल, अशी ही पहिलीच वेळ असेल. पाच महिला कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची ही पहिलीच वेळ आहे. पुरुष गटात अमन सेहरावत हा एकमेव कुस्तीपटू आहे. २००८ च्या बीजिंग ऑलिम्पिकपासून भारताने कुस्ती या खेळात प्रत्येक वेळी पदके जिंकली आहेत. या वेळी स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व पैलवानांकडून पदकांची अपेक्षा आहे. पहिल्यांदाच भारतीय कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकतील, अशी अपेक्षा आहे. भारतीय कुस्तीपटूंनी आतापर्यंत १९ वेळा ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला आहे. त्यात त्यांनी एकूण सात पदके जिंकली आहेत. देशासाठी कुस्तीतील पहिले ऑलिम्पिक पदक खाशाबा जाधव यांनी जिंकले. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये ५७ किलो वजनी गटात त्यांनी हे पदक जिंकले होते. भारताचा अनुभवी तरुणदीप चौथे ऑलिम्पिक खेळणार असून त्याला या वेळी रिकाम्या हाताने परतणे आवडणार नाही. महिला संघात दीपिकाकुमारी, भजन कौर आणि अंकिता भकट यांचा समावेश आहे. नेहमीप्रमाणेच दीपिका पुन्हा एकदा वैयक्तिक स्पर्धेत पदकाची दावेदार असेल. दीपिका गेल्या तीन वेळा चुकली असेल पण, आई झाल्यानंतर या वेळी तिने आत्मविश्वासाने पुनरागमन करणे कौतुकास्पद आहे. भारताच्या धनुर्विद्येच्या अपयशाचे प्रमुख कारण म्हणून आपण बरेचदा वाहत्या वाऱ्याला दोष देतो. आपल्या तिरंदाजांना जोरदार वाऱ्यात खेळण्याची सवय नाही, तर युरोपियन तिरंदाजांना वाऱ्याच्या वेगाचा फारसा फरक पडत नाही. सध्या फ्रान्समध्ये हवामान चांगले आहे. त्यामुळे 'विंड फॅक्टर'चा प्रभाव नसावा, असे वाटते. भारतीय तिरंदाजांनी गेल्या दोन वर्षांमध्ये उत्कृष्ट निकाल नोंदवले आहेत. ऑलिम्पिकमध्येही हा ट्रेंड कायम राहील अशी आशा आहे.

# पडघा टोल नाका समोरच खड्डे : वाहन चालकांची तारेवरची कसरत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा, अर्जुनली टोल नाक्याच्या १०० ते १५० मिटरच्या अंतरावर मोठे खड्डे पडले असून त्यातुन वाट काढताना वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असून तारेवरची कसरत करावी लागत आहे. पडघा ,अर्जुनली टोल रस्तावर १०० ते १५० मिटरच्या अंतरावर मोठे खड्डे पडले असून रस्त्याची



अतिशय दुरवस्था झाली आहे. सदर खड्डे कायम स्वरुपी कधी बुजवले जाणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून होत आहे. राज्यातील प्रमुख राष्ट्रीय महामार्गापैकी एक असणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावर दिवसभरात नाशिक ते मुंबई कडे जाणाऱ्या मोठ्या प्रमाणात गाड्यांची वर्दळ दिवसभरात सुरू असते. त्यात पावसाचे दिवस असल्याने रस्त्याची चालणं होऊन मोठे खड्डे पडले असुन ते पावसाच्या पाण्यामुळे भरल्याने त्यातुन वाट काढताना नागरीकांना, वाहनचालकांना, विद्यार्थ्यांना, रुग्णांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्ड्यांमुळे वाहने कासवाच्या गतीने जात आहेत.तर अनेक ठिकाणी खड्ड्यांमुळे प्रवाशांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. तर नागरिकांना खड्ड्यांमुळे कमरेचे आणि मानेचे आजार जडत आहे.संबधित प्रशासनाकडून खड्ड्यांसाठी अशी कुठलीही ठोस उपाययोजना केली जात नसून तात्पुरत्या स्वरूपात खड्डे भरले जात असून ते पुन्हा त्याच अवस्थेत असल्याची ओरड नागरिकांकडून केली जात आहे. तर संमधित पडघा टोल व्यवस्थापनाचा याकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांकडून नाराजी व्यक्त होतांना दिसत आहे. टोलनाक्यावर मोठ्या प्रमाणात टोल वसुली केली जाते मात्र कायमस्वरूपी खड्डे बुजवण्यासाठी का दुर्लक्ष केले जाते. हा सर्वीकडेच मोठा चर्चेचा विषय बनला आहे. राज्यातील प्रमुख राष्ट्रीय महामार्गापैकी एक असणाऱ्या मुंबई-नाशिक मार्ग म्हणून ओळखला जातो. अनेक लोकप्रतिनिधी विविध राजकिय पक्षाचे पदाधिकारी, नेते मुबई नाशिक महामार्गावर जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर करत असल्याने व बघुन सुध्दा त्यावर आवाज उठवत नसल्याने नागरीकांच्यात संतापाची लाट उसळली आहे. खड्ड्यांमुळे दुचाकी स्लिप होऊन अपघात होण्याची शक्यता स्थानिक नागरिकांकडून वर्तवली जात आहे. पडघा टोल रस्तावर असणारे खड्डे समंधित पडघा टोल व्यवस्थापन कधी बुजवणार ? असा प्रश्र्न स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. तर नागरिकांकडून खड्डे बुजविण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



## एमबीए प्रवेशासाठीच्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेस मुदतवाढ

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: 'शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एमबीए प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने मुदतवाढ देण्यात आली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली. बऱ्याच विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे व प्रमाणपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने पदव्युत्तर पदवी असलेल्या एम.बी.ए.च्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला शासनाने मुदतवाढ दिली असून सुधारित वेळापत्रकानुसार आता शनिवार, दि.२७ जुलै २०२४ पर्यंत रजिस्ट्रेशन करता येणार आहे. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व निश्चिती (कन्फर्मेशन) करण्यासाठी रविवार, दि.२८ जुलै २०२४ (सायं.५.००) पर्यंत मुदत दिली आहे. एम.बी.ए. प्रवेशासाठी कोणत्याही शाखेची पदवी

### स्वेरीमध्ये ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा

परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच एमएएच- एमबीए सीईटी २०२४ ही अथवा तत्सम परीक्षा दिलेली असावी. स्वेरीच्या एम.बी.ए. विभागाचे हे यंदाचे १६ वे वर्ष असून प्रत्येक वर्षी उत्तीर्ण होणारे विद्यार्थी नोकरीसाठी विविध पदांवर रुजू होतात. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली तज्ञ प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध आहे. या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहीतीसाठी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता प्रा. करण पाटील (मोबा. नंबर- ९५९५९२११५४) व एम.बी.ए.चे विभागप्रमुख डॉ. कमल गलानी (मोबा. नंबर- ९०२८३०३०७७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## शिरोळ तालुक्यात माधवराव घाटगे यांच्या रूपाने भाजपला नवा चेहरा मिळणार ?

पत्रकार नामदेव निर्मळे

भाजपच्या वतीने गुरुदत्त शुगर्सचे अध्यक्ष माधवराव घाटगे यांना उतरविण्याबाबत हालचाली सुरू आहेत. घाटगे यांच्या निमित्ताने भाजपला शिरोळ तालुक्यात नवा चेहरा मिळणार टाकळीवाडी येथील गुरुदत्त शुगर्सचे अध्यक्ष माधवराव घाटगे या निवडणुकीत भाजपकडून उमेदवारी मिळाल्यास लढविण्याची तयारी त्यांनी सुरू केली आहे. शिरोळ तालुक्यात आत्तापर्यंत चंद्रकांतदादा पाटील यांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी खेचून आणून रस्त्यांची डागडुजी यासह रस्ते बनवले आहेत.

त्याचबरोबर टाकळीवाडीच्या गुरुदत्त शुगर्स कारखान्याच्या माध्यमातून अनेकांच्या हाताला रोजगार मिळवून दिला आहे. त्यांचे वडील स्व. भगवानराव घाटगे यांनी चिंचवाड येथून प्रवास सुरू केला. माधवराव घाटगे यांनी त्यांच्या कार्याचा वसा पुढे चालू ठेवला आहे. आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांनी काम सुरू मताधिक्य देण्यात माधवराव कारखान्याच्या माध्यमातून काम करत असताना शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य मोबदला देण्यासाठी त्यांनी एक पाऊल पुढे टाकले आहे

घाटगे आपल्या भाषणात म्हणाले, राज्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या माध्यमातून आपण शिरोळ तालुक्यासाठी ७५ कोटी रुपयाचा निधी खेचून आणला आहे. यानंतर भाषणात बोलताना मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, माधवराव आता तुम्हीच शिरोळ तालुक्याचे आमदार व्हा अशी ऑफर देऊन एक प्रकारे खळबळच उडवून दिली होती.

पान १ वरुन

### राज्यातील पत्रकारांच्या एकीच्या ..

काम करणारे प्रतिनिधी हा चौथा स्तंभ मानला जातो. पण समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव आणि केंद्र व राज्य सरकारची एकूण धोरणे लक्षात घेता जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील प्रसारमाध्यम व्यवस्था कमजोर करण्याचेच प्रयत्न होत आहेत. वैयक्तीक संघटनेच्या माध्यमातून माध्यम क्षेत्रातील निर्माण झालेले प्रश्न सातत्याने सरकारी व्यवस्थेसमोर मांडून पाठपुरावा केल्यानंतरही या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची भूमिका घेतली जाते. कोरोना महामारीनंतर वृत्तपत्र व्यवसाय अडचणीत आला आहे. सरकारने अनेक क्षेत्रांना मदत केली पण वृत्तपत्र क्षेत्राला मदत केली नाही. कोरोनात दिडशेपेक्षा अधिक पत्रकारांचा मृत्यू झाला. घोषणा करूनही सरकारने मदत केली नाही. जाहिरातीवरील करापासून ते छपाईच्या कागदापर्यंत आणि पत्रकारांच्या अधिस्विकृतीपासून ते पेन्शन योजनेपर्यंत सातत्याने निवेदने, पाठपुरावा केल्यानंतरही शासन गांभिर्याने विषय समजून घेत नाही. मात्र मतपेटीचा विचार करून विविध घटकांना हजारो कोटी रूपयांच्या योजना दिल्या जातात. या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणार्या घटकाला मात्र वंचित ठेवले जात आहे. पत्रकारही प्रमुख घटक आहे, तो ही मतदार आहे याची आठवण करून देण्यासाठी आणि शांततेच्या संवाद मार्गाने सरकारला पत्रकारांचे प्रश्न सांगण्यासाठी ही यात्रा आहे. राजकीय व्यवस्थेवर अंकुश आणि समाजाचे प्रश्न मांडणार्या घटकाला आपले प्रश्न मांडण्यासाठी यात्रा काढावी लागत आहे हे दुर्देव. लोकशाहीत स्थानिक पातळीवरील पत्रकार ही व्यवस्था सक्षम राहिली तरच सामान्य माणसाचा आवाज बुलंद राहिल आणि व्यवस्थेवर अंकुश राखता येईल. यासाठी समाजातील विविध घटकांनीही पत्रकारांच्या मागण्यांसाठी पाठींबा द्यावा ही अपेक्षा आहे. दि.२८ जुलै २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिक्षाभूमी नागपूर येथून यात्रेचा शुभारंभ होईल. नागपूर, खान्देश आणि उत्तर महाराष्ट्र या तीन विभागातील जिल्हे आणि तालुक्यातून ही यात्रा शिर्डी येथे ३ ऑगस्ट रोजी येणार आहे. यात्रे दरम्यान प्रत्येक जिल्हा, तालुक्याच्या ठिकाणी पत्रकारांशी संवाद साधून त्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, साहित्यीक यांचा पाठींबा घेण्याचा प्रयत्न होणार आहे. दुसर्या टप्यात छत्रपती संभाजीनगर येथून यात्रेला सुरूवात होवून बीड, धाराशिव, सोलापूर, पंढरपूर, कोल्हापूर, सातारा, बारामती, पुणे या मार्गे दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंट्रलमध्ये यात्रेचा समारोप होईल. यात्रेत हजारोंच्या संख्येने पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते आणि पत्रकारप्रेमी संघटनांचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. सरकाने पत्रकारांचा विषय गांभिर्याने घेवून चर्चा करून न्याय देण्याची भूमिका घ्यावी अशी अपेक्षा आहे. यासाठी पत्रकारितेच्या इतिहासात पहिल्यांदाच निघणार्या या संवाद यात्रेत सर्वांनी सहभागी होवून आपल्या एकीच्या शक्तीचे दर्शन सरकारला द्यावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार परिषदेत केले.

### मुख्यमंत्री वयोश्री योजने'अंतर्गत

करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थी लाभार्थी व्यक्ती राज्यातील ज्येष्ठ नागरिक (ज्या नागरिकांनी दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत वयाची ६५ वर्षे पूर्ण केली असतील असे), लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.२ लाखाच्या आत असावे. याबाबतचे लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर व्यक्तीने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केलेले नसावे. याबाबतचे लाभार्थ्यांने स्वयं घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. पात्र लाभार्थ्यांने बँकेच्या खात्यात रु. ३ हजार थेट लाभ वितरण प्रणालीद्वारे वितरीत झाल्यावर सदर योजनेअंतर्गत विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा लाभार्थ्यांकडून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

आवश्यक कागदपत्रे : १) आधार कार्ड/ मतदान कार्ड ,राष्ट्रीयकृत बँकेची बँक पासबुक झेरॉक्स ,पासपोर्ट आकाराचे २ फोटो, उत्पन्नाचे स्वयंघोषणापत्र (अर्जासोबत जोडलेले), उपकरण/साहित्याचे दुबार लाभ न घेतल्याचे स्वयंघोषणापत्र (अर्जासोबत जोडलेले) आवश्यक आहे.जिल्ह्यातील जेष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी केले आहे.

### ॲड.प्रकाश आंबेडकर यांचे

याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.ही यात्रा मुंबई येथून २५ जुलै रोजी निघणार असून पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, अहमदनगर, उस्मानाबाद, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, जालना आणि औरंगाबाद येथे यात्रेचा समारोप होणार आहे.

### अर्थमंत्र्यांनी उघडली सामान्यांसाठी

कॅन्सरवरील ३ औषधांना कस्टम ड्यूटीमधून वगळण्यात आलंय. तर सोन्या-चांदीवरची कस्टम ड्युटी कमी होणार आहे. यामुळं सोनं-चांदी स्वस्त होण्याची शक्यता आहे. प्लास्टिकच्या वस्तू मात्र महागणार आहेत. याशिवाय, चप्पल, शूज, कपडे स्वस्त होणार, लिथियम बॅटरी स्वस्त होणार आहेत. यामुळे इलेक्ट्रिक कार्सदेखील स्वस्त होणार आहेत. मोबाईलचे पार्ट्स स्वस्त होणार आहेत.

पहिल्या नोकरीत एझ्रऋज खात्यात १५ हजार : अर्थमंत्र्यांनी २ लाख कोटी रुपयांच्या केंद्रीय खर्चासह ५ नवीन योजनांची घोषणा केली. नवीन नोकरी करणाऱ्या आणि देणाऱ्या दोघांना या योजनांचा लाभ मिळणार आहे. पहिल्या नोकरीत पहिला पगार सरकार देणार आहे. ही योजना सर्व क्षेत्रांना लागू असेल.नवीन नोकरी करणाऱ्या आणि देणाऱ्या दोघांना लाभ मिळणार आहे. ईपीएफओ रजिस्टर झाल्यानंतर ५० हजार रुपयांचा इंसेन्टिव्ह मिळणार आहे.

१०० शहरात औद्योगिक पार्क : देशातील १०० शहरांमध्ये औद्योगिक पार्क उभारले जाणार आहेत. पाच वर्षात १ कोटी तरुणांना इंटर्नशिप देण्यात येणार आहे.

रोजगारासाठी ५ नव्या योजना : नव्या रोजगार निर्मितीसाठी २ लाख कोटींची तरतूद केली जाणार आहे. ४.१ कोटी तरुणांना रोजगार देण्यासाठी पाच नवीन योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. आम्ही रोजगार, कौशल्य, एमएसएमई आणि मध्यमवर्गावर लक्ष केंद्रित करत असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

१० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज : 'देशांतर्गत संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी सरकार आर्थिक मदत करणार असल्याची मोठी घोषणा अर्थमंत्र्यांनी केलीय.

पाच वर्षांसाठी गरीब कल्याण योजनेत वाढ : निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर करताना पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना पाच वर्षांसाठी वाढवण्याची घोषणा केली. याचा देशातील ८० कोटी लोकांना लाभ होणार आहे.

मुद्रा लोनची मर्यादा वाढवली : ज्यांनी यापूर्वी कर्ज घेतले आहे आणि त्याची परतफेड केली आहे, त्यांच्यासाठी मुद्रा कर्जाची मर्यादा १० लाख रुपयांवरून २० लाख रुपये केली जाईल.

महागाईचा दर ४ टक्क्यांवर स्थिर : भारताचा आर्थिक विकास होत आहे. तसेच पुढील काही वर्षांमध्ये हा विकास असाच निरंतर होत राहील. भारतामधील महागाईचा दर ४ टक्के असा स्थीर राहिल असं अर्थमंयत्र्यांनी म्हटलंय.

### देवेंद्र फडणवीसांकडून अर्थसंकल्पाचे कौतुक

नव्या कररचनेत मोठ्या बदलांची घोषणा करत अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्मचा पहिला अर्थसंकल्प जाहीर केला. ४८ लाख २० हजार ५१२ कोटींचा हा अर्थसंकल्प आहे. मध्यमवर्गाला फायदा देत भविष्याचा वेध घेणारा अर्थसंकल्प, असे म्हणतफडणवीसांनी अर्थसंकल्पाचे कौतुक केले आहे. देशाचा अर्थसंकल्प संतुलित असून देशातील युवा, गरीब आणि शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून बनवण्यात आलेला संतुलित अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, सामाजिक कल्याणच्या विकासाचा दर महागाई दरापेक्षा जास्त आहे. आरोग्य क्षेत्रातला खर्च दुप्पट झालं आहे. या दोन्ही महत्त्वाच्या क्षेत्रातील गुंतवणूक दुप्पट केली आहे. मोठी गुंतवणूक करणारा हा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांसाठी नवीन योजना जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने रींशिप- ंिळलशीहळर्ं िलहशाश सुरू केली त्याच धर्तीवर केंद्र सरकारने देखील याची घोषणा केली.रोजगाराची निर्मिती मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. ग्रामविकास क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्यात येणार आहे.

## सावरकर विद्यालयात गुरु- शिष्य पुण्यतिथी साजरी

निफाड : निफाड-मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय, कोठुरे या विद्यालयात कर्मवीर काकासाहेब वाघ व कर्मवीर तात्यासाहेब बोरस्ते या गुरु शिष्यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक सानप एस.डी. होते. यावेळी व्यासपीठावर , सावकार एन. एल., पाटील राजेंद्र, निकम एस.बी. जाधव जी. व्ही., सुधाकर निकम, भडांगे के. आर., दवते आर. आर. श्रीमती गावले एन. एन., दाणी एस.डी. आदी उपस्थित होते.❊

कार्यक्रमाच्या सुरुवातीस व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर काकासाहेब वाघ व कर्मवीर तात्यासाहेब बोरस्ते❊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले❊.यावेळी विद्यार्थ्यांच्यावतीने दिव्या कोरडे हिने तर शिक्षकांच्या वतीने . भामरे एस. बी. यांनी गुरु❊ शिष्याच्या जोडीने सहकार क्षेत्रात तसेच शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केली असे सांगितले. तसेच मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या❊ जडणघडणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववी अ चा विद्यार्थी नंदन दिघे तर आभार प्रदर्शन मोगल यांनी केले. सदर कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.❊

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवस निमित्त खर्डी मध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन





**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहापूर / विजय घनघाव : शहापूर - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवस निमित्त खर्डी मध्ये नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ठाणे जिल्हा ग्रामीण महिला जिल्हाध्यक्ष सौ. कल्पना तारमळे यांच्या विशेष सहकार्यातून पार पडले. सदर शिबिरात विविध रक्त चाचण्या, मधुमेह, रक्तदाब, ई. सी. जी. आदी टेस्ट मोफत करण्यात आल्या. खर्डी परिसरातील शेकडो महिला आणि पुरुष वर्गानी या शिबिराचा लाभ घेतला. शहापूर मधील क्रिस्टल केअर रुग्णालय यांच्या सौजन्याने आरोग्य शिबीर आयोजिले होते. रुग्णालयाचे प्रशासक गणेश प्रधान यांनी भविष्यात सुद्धा अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन आम्ही शहापूर तालुक्यातील गावागावात करण्यासाठी तयार आहोत.. रुग्णसेवा हिच ईश्र्वरसेवा असं मानून आपल्या तालुका परिसरातील गोरगरीब जनतेसाठी आमचं रुग्णालयात नेहमीच मदत करण्याच्या भूमिकेत अग्रेसर असेल असं क्रिस्टल केअर रुग्णालयाचे प्रशासक गणेश प्रधान यांनी म्हटलं आहे. सदर शिबीर करिता राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे, प्रदेश चिटणीस डी. के. विशे सर, तालुका अल्पसंख्याक अध्यक्ष उस्मान शेख,सोशल मीडिया चे प्रफुल्ल शेवाळे, तालुका युवक कार्यकारिणी अभय वेखंडे,प्रतीक गायकवाड, केतन वेखंडे, जिल्हा कार्यकारिणी चे वैभव तारमळे, निखिल घोलप, महिला पदाधिकारी तस्लिम कोतवाल, काजल घोलप, स्वाती कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.. आगामी आरोग्य शिबीर मध्ये तालुक्यातील गरजू नागरिकांना मोफत डोळे तपासणी आणि मोफत चष्मे वाटप यासाठी नक्कीच प्रयत्न करून एक सामाजिक भावना जपण्यासाठी प्रयत्नशील असणार आहोत असं मत तालुका अध्यक्ष डॉ.मनोहर सासे यांनी व्यक्त केले आहे.

# विदर्भ पटवारी संघाचे तहसील कार्यालया समोर एक दिवशीय धरणे आंदोलन




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : जिल्हा प्रशासनाने अवैध रेती उत्खनन व अवैध रेती साठा प्रकरणी महसूल, पोलीस व परिवहन या तिन्ही विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची सामुहीक जबाबदारी असताना देखील केवळ आणि केवळ तलाठी यांना च जबाबदार धरून त्यांच्या गैरसोईच्या ठिकाणी बदल्यांचा तसेच नियतकालिक बदल्यांसाठी पात्र तलाठी यांचे समुपदेशन न घेता अन्यायकारक व बेकायदेशीर बदल्यांचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांना पाठविला आहे. तसेच बऱ्याच कालावधी पासून प्रलंबित मागण्याविषयी जिल्हा प्रशासनाच्या उदासीन धोरणा मुळे तलाठी व मंडळ अधिकारी संवर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्र्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या आठमुठे धोरण विरोधात प्रस्तावित अन्यायकारक बदल्या रद्द करणे व इतर प्रलंबित मागण्यासंदर्भात विदर्भ पटवारी संघ नागपूर, जिल्हा बुलढाणा यांनी मा. विजेंद्रकुमार धोंडगे, जिल्हाध्यक्ष यांचे नेतृत्वात दि. १६.०७.२०२४ रोजी जिल्हा प्रशासनाला आंदोलनाची नोटीस दिली आहे.

प्रस्तावित अन्यायकारक बदल्या रद्द करणे, प्रशासकीय बदलीस पात्र तलाठी यांचे समुपदेशन घेऊन बदल्या करणे,विनंती व आपसी बदल्या करणे, जिल्हा स्तरावरील तलाठी आस्थापना रद्द करणे., जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, नवीन लॅपटॉप व प्रिंटर विनाविलंब देण्यात देणे, प्रलंबित तलाठी कार्यालय भाडे, नायब तहसीलदार पदासाठी तलाठी / मं.अ.यांना खात्यांतर्गत विभागीय परीक्षा लागू करावी या शिवाय इतर प्रलंबित आर्थिक व सेवा विषयक मागण्या पूर्ण न झाल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला या आंदोलनाचा दुसरा टप्पा म्हणून तहसील कार्यालय सिंदखेडराजा समोर विदर्भ पटवारी मंडळअधिकारी संघ तालुका शाखा सिंदखेडराजा यांच्या वतीने एक दिवशी धरणे आंदोलन करण्यात आले. या धरणे आंदोलनास विविध पक्षाच्या आजी माजी पाधिकारी यांनी भेट देऊन पाठींबा दर्शविला आहे. कोतवाल संघटनेचे तालुका अध्यक्ष संजय आटोळे यांनी या आंदोलनास पाठींबा दर्शविला आहे.सदर सदर आंदोलनाच्या वेळी प्रेमानंद वानखेडे, केंद्रींय सहसचिव, शिवानंद वाकदकर जिल्हा सचिव, प्रशांत पोंधे माजी जिल्हा उपाध्यक्ष, रावसाहेब काकडे माजी जिल्हा सहसचिव, गजानन टेकाळे उपविभाग अध्यक्ष, आनंद राजपूत तालुका अध्यक्ष नितीन जुमळे तालुका सचिव विलास कटारे उपाध्यक्ष . दांडगे तलाठी.आजी माजी पदाधिकारी व सिंदखेडराजा तालुक्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी सभासद हजर होते.

# शाहीर सुभाष गोरे स्टार इंडियन अवॉर्डने सन्मानित

## सोलापूर जिल्ह्यातील शाहीराचा सन्मान



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी:: गुरुपौर्णिमेनिमित्त साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कला मंदिर येरवडा पुणे येथे भारतीय महाक्रांती सेना यांच्या वतीने दिला जाणारा सांस्कृतिक कलाक्षेत्रातील स्टार इंडियन अवॉर्ड देऊन शाहीर सुभाष गोरे यांना उद्योगपती चुनावाला, निकिता तुले एपीआय पुणे आयुक्त, चित्रपट अभिनेत्री गोस्वामी, अविनाश सरकुंडे, संतोष विरकर संयोजक आदी मान्यवरांच्या हस्ते स्टार इंडियन अवॉर्ड व युवा महाराष्ट्र फाउंडेशनचा महाराष्ट्र गौरव असे एकाच दिवशी गुरुपौर्णिमेनिमित्त दोन पुरस्कार देऊन शाहीर सुभाष गोरे यांना सन्मानित करण्यात आले सदरचा कार्यक्रम दि.२१ जुलै २०२४ रोजी संपन्न झाला.

या अगोदर शाहीर गोरे यांना सांस्कृतिक कलाक्षेत्रातील कलाभूषण, आदर्श शाहीर, कलारत्न, जीवनगौरव, आदी अनेक पुरस्कार मिळाले आहेत सांस्कृतिक कलाक्षेत्रात शाहीर गोरे यांनी दिल्ली, कलकत्ता, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, नागपूर, कर्नाटक, पश्र्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर, दक्षिण क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर, सांस्कृतिक कार्य संचालनालय सचिवालय मुंबई, शाहिरी महोत्सव, विविध कला महोत्सव, महासंस्कृती महोत्सव, सूचना व प्रसारण मंत्रालय दिल्ली, माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई, आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदवला आहे आपल्या लोककलेचे सादरीकरण करून लोककला जतन व संवर्धन करण्याचे काम केले आहे व करीत आहे लोककलावंतासाठी सामाजिक कार्य म्हणून शाहीर गोरे यांनी मेळावा, स्पर्धात्मक कला महोत्सव, उपोषण, आंदोलन, कलावंतांची शिबिरे, सांस्कृतिक कार्य विभाग मुंबई शाहिरी शिबिर, कला महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम राबविले आहेत कलावंतांच्या न्याय हक्कासाठी कायम प्रयत्नशील राहिले आहेत

मानाचा समजला जाणारा स्टार इंडियन अवॉर्ड व महाराष्ट्र गौरव पुरस्कार शाहीर गोरे यांना मिळाल्याने सोलापूर जिल्ह्यातून तालुक्यातून कलावंत, ग्रामपंचायत जवळा, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष मा. आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, यांनी शुभेच्छा दिल्या तसेच जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शालेय जीवनातील संधीचे सोने करा : आ.डॉ.राजेंद्र शिंगणे

## गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यातून विदर्भ न्याय ने दिला पर्यावरणाचा संदेश

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : हल्ली ग्रामीण भागात शिक्षणाच्या चांगल्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत साखरखेर्डा सारख्या आडवणी गांवात डॉ निलेश गावंडे यांनी शैक्षणिक हब बनवल्यामुळे शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षण घेत असताना आपण या संधीचे सोने केले पाहिजे भविष्यात मातृतिर्थ सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये आपण विविध प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करीत असून गुणवंत विद्यार्थ्यांचा आदर्श समोर ठेवून आपणही त्याही पेक्षा अधिक गुण कसे मिळविता येईल यासाठी डोळ्यात तेल घालून अभ्यास केला पाहिजे असे मत सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनी व्यक्त केले.



ते दि २३ जुलै २०२४ रोजी साखरखेर्डा येथील जगद्गुरू पलसिध्द महास्वामी पिठाच्या सभागृहात विदर्भ न्यायने आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तथा रमेशराव दंदाले यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलत होते. गतवर्षी प्रमाणे विदर्भ न्यायने गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्याचे दिमाखात आयोजन केले होते. प्रा अभय मासोदकर, सज्जनसींग राजपूत, संजय म्हस्के यांच्या संचाने जय जय महाराष्ट्र माझा या गीताने सभागृह दणाणून सोडले.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून शिवाचार्य रत्न सिध्दलिंग शिवाचार्य महाराज, सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज मठाधिपती पलसिध्द मठ, साखरखेर्डा, प्राचार्य डॉ बाळासाहेब गावंडे, राम जाधव माजी जिल्हा परिषद सदस्य, भोजराज गाडेकर संपादक विदर्भ न्याय, सौ सुमनताई सुनिल जगताप सरपंच साखरखेर्डा, रमेशराव ठोसरे, मुख्याध्यापक, जिजामाता विद्यालय,सौ पुनमताई महेंद्र पाटील माजी सरपंच, श्रीमती संध्याताई अशोक जडे, शिवशंकर डुकरे पाटील संचालक, श्री मॅथ्स कोचिंग क्लासेस, दिलीपराव खंडारे केंद्र प्रमुख साखरखेर्डा, पंजाबराव हाडे सचिव,सुनील जगताप माजी सभापती, जिजामाता विद्यालय, व्हि.टी. पंचाळ माजी मुख्याध्यापक जिजामाता विद्यालय, तेजराव बापू देशमुख माजी सभापती कृ.उ.वा. समिती, डॉ. प्रशांत भालेराव, अंकूर देशपांडे, दत्ता माळेकर, ज्ञानेश्र्वर पोधाडे, दाऊत कुरेशी,ललितसेठ अग्रवाल अध्यक्ष ग्रा.से.सो, ओमसेठ अग्रवाल,कमलाकर गवई माजी सरपंच, सुनिल देशमाने, मुख्याध्यापक, श्री शिवाजी हायस्कूल, प्रकाश इंगळे प्राचार्य सहकार विद्या मंदिर, सुनिल रिंढे पाटील, गोपाल पाझडे, संतोष दसरे माजी प्राचार्य, रामदाससिंग राजपूत माजी उपसरपंच, गजानन देशमुख सरपंच सवडद, मो. आरिफ, सैयद रफिक उपसरपंच, शुभमसिंग राजपूत, भानुदास लव्हाळे, दत्ता घोडके, कैलास ढोलेकर, पंढरी शेळके, विष्णू बनकर, कवी रामदास कोरडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी आपल्या प्रास्ताविकात विदर्भ न्यायचे कार्यकारी संपादक संतोष गाडेकर म्हणाले की, वृत्तपत्रिय जगण्याच्या वर्तुळाबाहेर विविध उपक्रम आम्ही विदर्भ न्यायच्या माध्यमातून राबवित आहोत. आज साहेबांच्या हस्ते लावलेलं विदर्भ न्याय हे साप्ताहिक सोशल मीडियाच्या जमाण्यात केवळ व्हाटसअपवर पीडिएफ न काढता रंगीत दुनियेत छपाईरूपात भाड्याच्या तीन कोटी रूपायाच्या वेब ऑफसेटवर ऑफसेटमालकाच्या वृत्तपत्राच्या खपाबरोबर आम्ही प्रकाशित करतो ही मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.अनेकदा सत्य परिस्थिती मांडतातान ती परिस्थीती विरोधात जाते त्यामुळे काहींना वैर असल्यासारखे वाटते पण तसा आमचा अजिबात हेतू नसतो. सकारात्मक दृष्टीने लिहत असताना अशा बाबीची मात्र कुणी दखल घेत नाही. नकारात्मक बाबी मात्र लक्षात ठेवतात. ही एक शोकांतीका आहे. तरी देखील विदर्भ न्याय सजग पहारेकरी काम करीत आहे, विद्याथांना प्रेरणादायी असे विविध उपक्रम विदर्भ न्याथ आपल्या बळावर यापुढेही सुरूच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मठाधिपती सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे, अल्प निद्रा हा यशस्वी होण्यासाठी चांगला मार्ग आहे अनेक महान क्रांतिकारकांनी जीवनाचा त्याग करून यशोशिखरावर पोहोचले आहे त्यामुळे यशस्वी होण्यासाठी त्याग आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी डॉ बाळासाहेब गावंडे यांनी स्पर्धा परीक्षेकडे वळले पाहिजे असे सांगून साखरखेर्डा सारख्या ठिकाणी उच्च शिक्षणाचे दालन उघडताना याही पेक्षा वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षण प्रणाली उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान रमेश दंदाले, कु प्रांजली जाधव यांची समयोचित भाषणे झाली. यावेळी दहावी अकरावी, नेट, आय आय टी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र व वृक्ष देऊन गौरविण्यात आले. यावेळी जिजामाता विद्यालयाचे शिक्षक रमेशराव दंदाले माजी परिषद सदस्य सौ शारदाताई दंदाले यांचा सेवापूर्ती सोहळा पार पडला. गणितामध्ये दहावर्षात दोन हजार विद्यार्थ्यांना गणितामध्ये पारंगत करणारे शिवशंकर डुकरे पाटील यांचाही सन्मान करण्यात आला.तर बी ए एम एस झालेल्या डॉ अंकिता भीमराव गवई यांचाही सत्कार करण्यात आला.ज्ञानगंगा क्लासेस साखरखेर्डा ची विद्यार्थिनी सौ निकिता मयूर दंदाले यांची दंत सहाय्यक या पदावर शासकीय ग्रामीण रुग्णालयात नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी १५१ वृक्षांचे वाटप करण्यात येऊन झाडे लावा झाडे जगवाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुधाकर पऱ्हाड यांनी तर आभार प्रदर्शन असलम अंजूम यांनी केले. यावेळी एक हजार विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विनोद देशमुख, दीपक गवळी, संजय देशमुख, उमेश गंभीर, सुरज स्वामी, सतिष देशमुख, संजय देशमुख, विलास आंभोरे, तुषार भौरकर यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी श्री शिवाजी हायस्कूल, जिजामाता विद्यालय, स्व भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, उर्दू हायस्कूल, सहकार विद्या मंदिराचे शिक्षक तथा विद्यार्थी उपस्थित होते

# पंचप्पा कल्याणशेट्टी यांचे कार्य वंदनीय..

## महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या शिक्षण संकुलनात पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रमात मान्यवराकडून गौरवोद्गार



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी :पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी सीमावर्ती भागातील बहुजन समाजातील नागरिकांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे या भूमिकेतून भरीव योगदान दिले, म्हणून त्यांचे कार्य वंदनीय आहे, असे प्रतिपादन संचालक मल्लिनाथ मसुती यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था,अक्कलकोट संचलित शिक्षण संकुलातील सर्व शाखांच्या वतीने कै. पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या ९ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, रूपाली शहा, बापूजी निंबाळकर, खंडेराव घाडगे,शिवानंद पुजारी,खिरप्पा गवंडी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी,दिगंबर जगताप आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी कु.श्रद्धा मोरे, कु. वैष्णवी टपाले,कु सादिया शेख, कु नेहा पवार,कु भाग्यश्री बिराजदार,कु नंदिनी पाटील,कु प्रज्ञा दसाडे या मुलींनी समूहगीत सादर केले.

यावेळी बोलताना शांभवी कल्याणशेट्टी म्हणाले की, महिलांनी शिक्षण घेतले पाहिजे म्हणून अण्णांनी स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले. बहुजन समाजातील मुला मुलींना शिक्षण मिळावे म्हणून शाळा महाविद्यालय कार्यान्वित केली. त्यामुळेच विकासाच्या सर्वांगीण वाटा दिसल्या. वंचित उपेक्षित समाजाला न्याय मिळाला. यानंतर कु श्रेया बिराजदार,कु वेदांती मसलेकर,कु संस्कृती जोजन,कु आदिती बाणेगाव या मुलींनीही भाषण केले. यानंतर पुण्यतिथीनिमित्त शाळेत विविध कार्यक्रम घेण्यात आले. यात वृक्षारोपण करणारी मुले-मुली, पावसाचा आनंद घेणारी मुले-मुली, परिसर स्वच्छ करणारी मुले-मुली या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आले. तर लहान गट व मोठा गट याप्रमाणे हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आले. या दोन्ही स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.कार्यक्रमाचे प्रास्ताविक खंडेराव घाटगे यानी व सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार सेमी इंग्लिश विभाग प्रमुख दिगंबर जगताप यांनी मानले.

# डाळिंब शाळेत शिक्षण सप्ताह

**दैनिक यशसिध्दि न्यूज** उमरगाः उमरगा तालुक्यातील डाळिंब येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शिक्षण सप्ताह साजरा करत असताना दुसऱ्या दिवशी मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस यासंबंधी श्रीमती कुलकर्णी एस.सी. याने गणित संख्याज्ञान गणित साक्षरता याबाबत सखोल ज्ञान प्रात्यक्षिकामधून विद्यार्थ्यांना दिले. यावर विद्यार्थ्यांनी अनेक साहित्य आपल्या कल्पनेतून तयार केले मुख्याध्यापक व केंद्राचे केंद्रप्रमुख कोकळगावे ए एन यांनी अभिनंदन केले.



# पांढरेवाडीत अवैध धंदे: स्मशानभूमीत आमरण उपोषण

## दुसऱ्या दिवशी आंदोलनास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : पांढरेवाडी गावात गेल्या अनेक वर्षापासून देशी विदेशी आणि हातभट्टीची दारू जुगार असे अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालत आहेत व या अवैद्य व्यवसायामुळे गावातील युवक व्यसनाधी न झालेले आहेत आणि कुटुंबांची वाहत आहात झालेली आहे त्यामुळे या अवैध व्यवसायांच्या विरोधात ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात आवाज उठवला आहे गेल्या सहा ते आठ महिन्यापासून करकम पोलीस ठाण्यातून ते कोल्हापूर परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्यापर्यंत निवेदने दिलेली आहेत




यापूर्वी करकम पोलीस ठाण्यासमोर आंदोलन केलेली आहेत काही दिवस दारू विक्री बंद करण्यात आली होती मात्र परत पुन्हा अवैध दारू विक्री डोके वर काढत आहे यामुळे सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब चिखलकर यांनी गावच्या मशानभूमीत आमरण उपोषण आंदोलन सुरू होते सुरू केले आहे शनिवारी दुसऱ्या दिवशीही गावातील महिलांनी या आंदोलनात सहभाग दर्शवला आहे वैद्य व्यवसाय बंद करण्यासाठी मागणी केली पांढरेवाडी गावातील अवैध व्यवसाय बंद करावी यासाठी महिलांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे सर्व महिला आक्रमक झालेल्या दिसत आहेत होणाऱ्या काळात हा लढा फार व्यापक आणि आक्रमक होण्याची शक्यता आहे पोलीस प्रशासनांनी या आंदोलनाची दखल घ्यावी आणि संबंधित वैद्य व्यवसाय करणाऱ्या वर कायदेशीर कारवाई करावी नाहीतर कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे

# कृष्णा नदीचे वाहून जाणारे पाणी दक्षिण भागातील गावांना द्या : आ समाधान आवताडे

## आ.आवताडे यांच्या मागणीवर कृष्णा-खोरे महामंडळाचा सकारात्मक प्रतिसाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मंगळवेढा/प्रतिनिधी: म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे कृष्णा नदीतील वाहून जात असलेले पाणी मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील १९ गावांना देण्याची मागणी मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळ कार्यकारी संचालक पुणे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

सदर मागणी करत असताना आमदार आवताडे यांनी पत्रात नमूद केले आहे की, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागामध्ये म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या पाण्याचा रेवेवाडी, हुन्नूर, लोणार, महमदाबाद हु, पडोळकरवाडी, शिरनांदगी, मारोळी, चिक्कलगी, जंगलगी, सलगर बु, सलगर खु, बावची, पौट, आसबेवाडी, लवंगी, शिवणगी, येळगी, सोड्डी, हुलजंती या १९ गावांना लाभ होतो. मागील दोन पाण्याची आवर्तने झाली परंतु मंगळवेढा तालुक्यातील लाभक्षेत्राच्या शेतकऱ्यांनी वारंवार मागणी केली तसेच मी स्वतः फोनद्वारे, पत्राद्वारे बऱ्याच वेळा पाणी देण्याबाबत मागणी केलेली असताना सुद्धा शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळालेले नाही. आता पावसाळा सुरू असून वरच्या भागात पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असून कृष्णा व पंचगंगा नद्या दुथडी भरून वाहत असून त्या नद्यांना पूर आलेला आहे परंतु मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागामध्ये अलीकडे अत्यल्प पाऊस पडल्याने या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

त्यामुळे कृष्णा नदीतून वाहत जाणारे पाणी म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे या भागात दिले तर या भागातील बंधारे, पाझर तलाव, साठवण तलाव भरून घेता येतील आणि या भागातील भूजल पातळी वाढण्यास मदत होईल.

तसेच दक्षिण भागातील शेतकऱ्यांची पाणी मागणी असल्याने म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे टेल टू हेड नियमाप्रमाणे मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील रेवेवाडी, हुन्नूर, लोणार, महमदाबाद हु, पडोळकरवाडी, शिरनांदगी, मारोळी,



चिक्कलगी, जंगलगी, सलगर बु, सलगर खु, बावची, पौट, आसबेवाडी, लवंगी, शिवणगी, येळगी, सोड्डी, हुलजंती या १९ गावांना हे पाणी लवकरात लवकर सुरू करण्यात यावे तसेच विशेषतः लवंगी, पडोळकरवाडी, शिरनांदगी व मारोळी येथील साठवण तलाव प्राधान्याने भरून द्यावेत अशीही मागणी मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे.

आमदार आवताडे या मागणीची दखल घेऊन सोमवारी पुणे येथे कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक कपोले साहेब यांनी या विषयावर बैठक घेऊन अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना या योजनेतून येणाऱ्या पाण्यातून भागातील बंधारे, पाझर तलाव व साठवण तलाव भरून घेण्याचे निर्देशीत केले आहे.

या योजनेद्वारे येणाऱ्या पाण्याचा येथील शेतकरी व नागरिकांनी आपापसात कोणत्याही प्रकारचे वाद न करता योग्य आणि आवश्यक पद्धतीने आपल्या भागातील सर्व बंधारे, साठवण व पाझर तलाव भरून घेण्याचे व संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी त्याचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वारी कालावधीत रुग्णवाहिकेच्या माध्यमातून १ हजार ४३७ गंभीर रुग्णांना अत्यावशक सेवेचा लाभ

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: आषाढी यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात सुमारे १५ लाखांहून अधिक भाविक दाखल झाले होते. यात्रा कालावधीत भाविकांना प्रशासनाकडून सर्व आवश्यक सुविधा देण्यात आल्या होत्या. यात्रा कालावधीत वारकऱ्यांना आरोग्याच्या तात्काळ व दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने ३० रुग्णवाहिका (१०८) या वारीत सहभागी झाल्या होत्या. या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून वारीत १ हजार ४३७ गंभीर रुग्णांना अत्यावशक सेवेचा लाभ झाला.



या रुग्णांना तात्काळ वैद्यकीय सेवा देण्यास १०८ रुग्णवाहिका यशस्वी ठरली असल्याची माहिती बीव्हीजी १०८ रुग्णवाहिकेचे विभागीय व्यवस्थापक विठ्ठल बोडके यांनी सांगितले.

आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांच्या आरोग्य सुविधेसाठी १७ रुग्णवाहिका वेगवेगळ्या ठिकाणी थांबवलेल्या होत्या तसेच ११ रुग्णवाहिका आरोग्य शिबीर ठेवण्यात आल्या होत्या तर रुग्णवाहिका या रिलेसाठी राखीव ठेवलेल्या होत्या अशा एकूण ३० म्बुलन्स च्या माध्यमातून या वर्षी १ हजार ४३७ गंभीर रुग्णांना अत्यावशक सेवेचा लाभ झाला. सन २०१४ मध्ये प्रथमच १०८ रुग्णवाहिकांनी वारीमध्ये सेवा दिली. त्यानंतर अव्यातपणे कोणताही खंड पडू न देता वारी कालावधीत रुग्णवाहिका वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध ठेवण्यात आल्या असल्याचे व्यवस्थापक श्री बोडके यांनी सांगितले. या आषाढी यात्रा कालावधीत दरवर्षी पेक्षा मोठ्या संख्येने वारकरी भाविक आले होते.

वारीत आरोग्याची सुविधा कोलमडून न देता चांगल्या रुग्णसेवा देण्याचे काम १०८ रुग्णवाहिकेच्या सहाय्याने आरोग्य कर्मचाऱ्यांनी पार पाडले आहे.यामध्ये रुग्णवाहिका व त्यावर काम करणारे डॉक्टर, पायलट यांनी वारी काळामध्ये उल्लेखनीय काम केले असल्याचे उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश सुडके यांनी सांगितले. तसेच सोलापूर जिल्हा को-ऑर्डिनेटर डॉ. अनिल काळे व सांगली जिल्हा को-ऑर्डिनेटर डॉ. कौस्तुभ घाटूळे यांचे यावेळी त्यांनी कौतुकही केले.

आषाढी यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात आलेल्या भाविकांना तसेच पालखी मार्गावर १०८ रुग्णवाहिकेच्या माध्यमातून रुग्णसेवा देणाऱ्या डॉक्टर, रुग्णवाहिका चालक, कर्मचारी यांचा सत्कार प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, आषाढी वारी सोहळा नुकताच निर्विघ्नपणे पार पडत असताना १०८ रुग्णवाहिका गेली अकरा वर्ष पालख्या जागेवरून निघाल्यापासून ते गोपाळकाल्यापर्यंत सेवा देत असतात यामध्ये पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना अत्यावश्यक सेवा उपलब्ध करून देणे त्याचबरोबर एखाद्या ठिकाणी आपत्कालीन समस्या उभी राहिल्यास योग्य ती मदत करणे,अशा पद्धतीचे काम १०८ रुग्णवाहिका गेल्या अकरा वर्षापासून काम करत आहेत.

या रुग्णवाहिकेवर काम करणारे डॉक्टर ,पायलट व ई.आर.ओ यांचे अव्यातपणे ,अखंड काम चालू असते परंतु हे काम कोणाला दिसत नसते. त्यांचे मानावे तेवढे आभार थोडे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमचे टीम मॅनेजर ऋषिकेश जोशी त्याचबरोबर पुणे,लातूर,धाराशिव, सातारा, सोलापूर, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील सर्व (इ.एम.एस.ओ) डॉक्टर तसेच पुणे , लातूर,धाराशिव,सातारा, सोलापूर,सांगली व सोलापूर जिल्ह्यातील सर्व पायलट यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

# स्टार प्रवाहच्या घरोघरी मातीच्या चुली मालिकेत पार पडणार ऋषिकेश-जानकीचा विवाहसोहळा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

लग्नाच्या १० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने लाडके दादा-वहिनी पुन्हा अडकणार लग्नाच्या बेडीत

संगीत सोहळ्यासाठी नित्या-अधिराज, अंकुश-अबोली, सत्या-मीरा आणि छोट्या उस्तादांची खास हजेरी

स्टार प्रवाहच्या घरोघरी मातीच्या चुली मालिकेत जानकी-ऋषिकेशच्या लग्नाची धामधूम सुरु झाली आहे. जानकी-ऋषिकेशच्या लग्नाच्या १० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने संपूर्ण रणदिवे कुटुंबाने मिळून पुन्हा एकदा दोघांच्याही लग्नाचा घाट घातलाय. मेहंदी आणि हळदीचा कार्यक्रम थाटात पार पडल्यानंतर आता लगबग सुरु आहे ती संगीत सोहळ्याची. जानकी-ऋषिकेशने संगीत सोहळ्यासाठी फिक्का जांभळ्या रंगाचा पोशाख परिधान केला आहे. संगीत सोहळ्यात जानकी-ऋषिकेशच्या प्रेमाचा प्रवास



उलगडणार आहे. त्यामुळे रणदिवे कुटुंब जानकी-ऋषिकेशच्या रंगात रंगून गेलं आहे.

रणदिवे कुटुंबासोबतच सुख म्हणजे नक्की काय असतं मालिकेतील नित्या-अधिराज, अंकुश-अबोली, साधी माणसं मालिकेतील सत्या मीरा आणि वैशाली सामंतसोबत छोट्या उस्तादांनी देखिल खास हजेरी लावली आहे. तेव्हा पाहायला विसरु नका घरोघरी मातीच्या चुली सायंकाळी ७.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# सर्व धर्मियांमधील ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे व त्यावरील वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

देशात हिंदू धर्मात चारधाम यात्रा, अमरनाथ यात्रा तसेच इतर धर्मियांचीही मोठी तीर्थस्थळे आहेत जिथे पुण्यकर्म म्हणून आयुष्यात एकदा तरी जाण्याचे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते. सदर बाब विचारात घेवून सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना जाऊन मनःशांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे व त्यावरील वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना दि.१४ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेतून प्रति व्यक्ती ३० हजार रुपये खर्चाची कमाल मर्यादा असून यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास आदी बाबीचा समावेश असेल. भारतातील ७३ व राज्यातील ६६ निर्धारित स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता योजनेतून एकवेळ लाभ घेता येईल. सदर योजनेतून पात्र प्रवाशांची निवड ही पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे करण्यात येईल.

या योजनेतून निवड होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. सदरअर्ज करण्यासाठी नवीन वेबसाईट तयार करण्याचे काम शासनस्तरावर सुरू आहे. अर्ज करताना आधारकार्ड, रेशनकार्ड, अधिवासबाबत पुरावा, उत्पन्न दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, मोबाईल क्रमांक, योजनेच्या अटी पालन करणेबाबत हमीपत्र इ. कागदपत्रे आवश्यक राहतील. योजनेचे अर्ज स्विकारणे कामी शासन स्तरावरून पोर्टल सुविधा उपलब्ध करून देणे बाबत कार्यवाही सुरू आहे.

तत्पुर्वी योजनेच्या अनुषंगाने इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी कागदपत्रांची पुर्तता आपले स्तरावर करावी व पोर्टल सुरू होताच अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी मिहान, बुटीबोरी व हिंगणा येथे विशेष कॅम्पचे आयोजन : जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नागपूर : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना एक अभूतपूर्व संधी उपलब्ध झाली आहे. आपल्या शैक्षणिक पदवी अथवा पदविकासह प्रत्यक्ष कार्यानुभवाची जोड जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत आवश्यकते धैर्य निर्माण होत नाही. विद्यावेतनासह अनुभवाची बेरोजगारांना मिळालेली ही अपूर्व संधी आहे. याचबरोबर उद्योग जगतालाही आपल्याला आवश्यक असेल तसे मनुष्यबळ या नव्या अभिनव योजनेतून उपलब्ध होत असल्याने याला अधिक सकारात्मक उर्जेची जोड मिळेल असा विश्र्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाने लोक कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून नुकत्याच घेतलेल्या या महत्वपूर्ण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आज नागपूर मधील विविध औद्योगिक क्षेत्रातील प्रमुखांसमवेत त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुनंदा बजाज, असोशिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कार्पोरेशन नागपूरचे अध्यक्ष आशिष काळे, ॲडव्हांटेज विदर्भचे विश्र्वस्त राजेश रोकडे, प्रशांत उगेमुगे, हॉटेल मॅनेजमेंटचे तेजींदर सिंग, बुटीबोरी इंडस्ट्रीयल असोशिएशनचे प्रशांत मेश्राम, बैद्यनाथचे श्री शर्मा व इतर उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आजच्या स्थितीत सुशिक्षित बेरोजगारांकडे अनुभव हा कळीचा मुद्दा आहे. मख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून हा प्रश्र्न आता दूर झाला असून बेरोजगारांना या सहा महिन्याच्या अनुभवातून उद्याच्या उज्ज्वल यशाचा पाया भक्कम करता येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

या योजनेसाठी खाजगी कंपन्यांना आपल्याकडे सामावून घेता येऊ शकेल एवढ्या मनुष्यबळाची उपलब्धी करुन दिली जाणार आहे. यासाठी https://rojgar.mahaswayam.gov.in//home/index महास्वयंम या संकेतस्थळावर नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे. ही रिक्त पदे पोर्टलवर नोंदविण्यासाठी नागपूर येथील विविध उद्योग जगत स्वयंस्फूर्त पुढे येईल,

असा विश्र्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला. ऑनलाईन फॉर्म भरतांना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात यासाठी नागपूर येथे मिहान, बुटीबोरी व हिंगणा येथे विशेष कॅम्पचे आयोजन लवकरच केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

ज्यांना रोजगार द्यायाचा आहे त्यांच्यामध्ये आपल्या उद्योग कंपन्यांबाबत आवश्यकते कौशल्य असणे याबाबत विविध उद्योगांच्या आस्थापनेत नेहमी साशंकता असते.




दुसऱ्या बाजुला बेरोजगारांना प्रत्यक्ष अनुभवाची पुरेशी संधी मिळणे क्रमप्राप्त राहते. बेरोजगार व उद्योजक यांच्यामध्ये ही योजना एक सुवर्णमध्य साध्य करुन देणारी असल्याचे प्रतिपादन ॲडव्हांटेज विदर्भचे विश्र्वस्त राजेश रोकडे यांनी केले. अनुभवासमवेत वेळेची किंमत, शिस्त याचे अप्रत्यक्ष कौशल्य बेरोजगारांमध्ये निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.

योजना जेव्हा जाहीर झाली तेव्हा एकप्रकारची मनात भिती होती. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी या योजनेतील सर्व बारकावे समजून सांगितल्यामुळे आमची ही भिती दूर झाली. याच बरोबर उद्योजक व बेरोजगार यांच्या परस्पर हिताची ही एक अत्यंत महत्वपूर्ण योजना असल्याने आम्हाला अधिक आनंद झाल्याची प्रतिक्रिया असाशिएशन ऑफ इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंटचे प्रशांत उगेमुगे यांनी दिली. ज्यांना रोजगार द्यायचा आहे त्यांच्यामध्ये या योजनेबाबत अधिक आशादायक वातावरण निर्माण झाल्याचे आशिष काळे म्हणाले.